गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २८१ वा ● शनिवार ०२ मार्च २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 281 | Date : 02/03/2024 blow :Saturday Page 4 Price 4

## सरकारी कर्मचाऱ्यांना सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू

मुंबई : राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतील (एनपीएस) बाजारामधील चढ-उतारामुळे निर्माण होणारी गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासन स्वीकारेल असे जाहीर करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचारी-अधिकाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा निर्णय आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात जाहीर केला. या निर्णयानुसार कर्मचाऱ्यांनी विकल्प दिल्यास त्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ, तसेच निवृत्तीवेतनाच्या ६० टक्के इतके कुटुंब निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ मिळणार आहे.



'हा निर्णय लाखो कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या उज्वल भविष्याच्या दृष्टीनं महत्वाचा आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दृष्टीनंही हितकारक ठरेल,असा विश्र्वास मुख्यमंत्री यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच कर्मचारी संघटनांना दिलेला शब्द पाळल्याचेही नमूद केले. राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना सुधारित करण्यासाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालावर अभ्यास केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री निवेदनात म्हणाले की, दिलेल्या आश्र्वासनानुसार राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना सुधारित करण्यासाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव व सेवा विभागाचे अपर मुख्य सचिव यांनी संघटनेसोबत चर्चा करुन सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची तत्वे निश्र्चित केली आहेत. त्यास अधिकारी, कर्मचारी संघटनेनेही सहमती दर्शवली आहे समितीचे निष्कर्ष व शिफारशी विचारात घेऊन राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतील बाजारामधील चढ-उतार यामध्ये निर्माण होणारी गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासनाने स्विकारावी हे शिफारशीतले तत्व मान्य । पान २ वर

## नमो महारोजगार मेळाव्याचे शरद पवार यांना निमंत्रण

पुणे : बारामती येथे उद्या (२ मार्च) होणाऱ्या 'नमो महारोजगार मेळाव्या'साठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना या कार्यक्रमाचे निमंत्रण न देण्यावरून वाद सुरू असतानाच जिल्हा प्रशासनाकडून पवार यांना निमंत्रण देण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाने मेळाव्याची सुधारित निमंत्रणपत्रिका प्रसिद्ध केली आहे. कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नावीन्यता विभागाच्यावतीने विभागस्तरीय नमो महारोजगार मेळावा बारामती येथे २ आणि ३ मार्च आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

## नार्वेकरांच्या आदेशाविरोधातील याचिकेवर ७ मार्चला सुनावणी

नवी दिल्ली : महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आदेशाविरोधात उद्धव ठाकरे गटाची याचिका सर्वोच्च न्यायालयात ७ मार्च रोजी सूचीबद्ध होणार आहे. या प्रकरणाची सुनावणी ७ मार्च रोजी करणार असल्याचे



सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. नार्वेकर यांनी जून २०२२ मध्ये शिवसेना पक्ष फुटल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना गटालाच खरा राजकीय पक्ष म्हणून घोषित केले होते. ठाकरे गटाच्या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती धनंजय यशवंत चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर १ मार्च रोजी सुनावणी होणार होती. ठाकरे गटातर्फे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी याचिकेचा संदर्भ दिला आणि आज सुनावणी होणाऱ्या खटल्यांच्या यादीत नसल्याचे सांगितले. सरन्यायाधीशांनी ७ मार्च रोजी सुनावणी होणार असल्याचे सांगितले.

## विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे सूप वाजले

मुंबई : विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस होता. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसाचे कामकाज संपल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विधान परिषद सभागृहातून बाहेर पडले. ते विधान भवनाच्या बाहेर जात होते. यावेळी विधान भवन परिसरात काँग्रेस आमदार विश्वजित कदम हे देवेंद्र फडणवीस यांना शोधत धावत येताना दिसले. ते फडणवीस यांना पाहून आवाज देत होते. याबाबत फडणवीस यांना समजले. त्यानंतर त्यांनी त्यांच्याशी बातचित करायला सुरुवात केली. यावेळी विश्वजित थांब तुझासुद्धा लवकरच मुहूर्त लावतो, असे फडणवीस म्हणाले. विश्वजित कदम आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट कॅमेऱ्यात अचूकपणे कैद झाली. दोन्ही नेते आणि त्यांच्यासोबत इतर नेते यावेळी विधान भवनाच्या बाहेर पडले.

## एसटीबसमधून दागिने लंपास

अक्कलकोट /प्रतिनिधी : येथील एसटी बसस्थानकात नातेवाईकांसह एसटी बसमध्ये चढत असताना चोरट्यांनी नीता बाळासाहेब देवकते (वय ४०, रा. उपळाई, ता. माढा) या महिलेची एक लाख ९० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने असलेली पिशवी हातोहात लांपास केली. दुपारी तीनच्या सुमारास गर्दीचा फायदा घेऊन चोरट्यांनी 'हाथ की सफाई' केली. तर अन्य एका घटनेत रत्नमाला रामचंद्र सुतार (रा. वागदरी, ता. अक्कलकोट) या एसटी बसमधून गावाकडे निघाल्या असताना चोरट्यांनी त्यांच्याकडील पावणेदोन लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेले. पुणे-कलबुर्गी बसमध्ये हा प्रकार घडला. या दोन्ही गुन्ह्यांची नोंद अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात झाली आहे.

## बांगलादेशात सात मजली इमारतीला भीषण आग, ४४ जणांचा मृत्यू

नवी दिल्लीः बांगलादेशची राजधानी असलेल्या ढाका या ठिकाणी गुरुवारी रात्री उशिरा एका सात मजली इमारतीला भीषण आग लागली. या घटनेत ४४ जणांचा मृत्यू झाला आहे. तर अनेक लोक होरपळून जखमी झाले आहेत. बांगलादेशचे आरोग्य मंत्री सामंत लाल सेन यांनी ढाका मेडिकल कॉलेज रुग्णालयाचा दौरा केला त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. ढाका येथील रुग्णालयाच्या बर्न विभागात ४० जखमींवर उपचार सुरु असल्याची माहितीही त्यांनी दिली.



अग्निशमन दलाचे अधिकारी मोहम्मद शिहाब यांनी सांगितलं ढाका येथील बेली रोड भागात बिर्याणीचं एक प्रसिद्ध रेस्तराँ आहे. या ठिकाणी रात्री ९ वाजून ५० मिनिटांनी आग लागली. ही आग पाहता पाहता संपूर्ण इमारतीत पसरली. दोन तासांच्या अथक प्रयत्नांनी अग्निशमन दलाच्या जवानांनी ही आग नियंत्रणात आणली आहे. रेस्तराँमध्ये बसलेल्या ७५ लोकांना आम्ही जिवंत बाहेर काढलं आहे अशीही माहिती शिहाब यांनी दिली. -छख ने हे वृत्त दिलं आहे. ढाका येथील बेली रोड भागात असलेल्या ज्या इमारतीत आग लागली तिथे रेस्तराँसह कपडे, मोबाईल यांची दुकानं आहेत. रेस्तराँचे मॅनेजर सोहेल यांनी सांगितलं की आम्ही सुरुवातीला जेव्हा धूर निघताना पाहिला तेव्हा आम्ही सहाव्या मजल्यावर होतो. आम्ही पाइपच्या मदतीने खाली आलो. काही लोकांनी वरुन उड्या मारल्याने ते जखमी झाले. भीषण आग लागल्याने अनेक लोक इमारतीच्या छतावरच अडकले होते.

## दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर ५ रुपयांच्या अनुदानासाठी पुरवणी मागणी,

### पुनर्विनियोजनाद्वारे निधी उपलब्ध करणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई : राज्याची आर्थिक स्थिती चांगली असून आर्थिक आव्हानांना तोंड देण्याची ताकद महाराष्ट्राकडे निश्र्चितपणे आहे. महाराष्ट्राला १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्याचे उद्दिष्ट निर्धारित वेळेत गाठण्यात येणार आहे. यादृष्टीने नियोजन केले असून राज्याच्या महसुली उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. आर्थिक शिस्त पाळताना अनावश्यक खर्च टाळण्यात येत आहे. अशा उपाययोजना आणि कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यापुढील आर्थिक आव्हानांवर यशस्वीपणे मात केली जाईल, असा विश्र्वास उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानसभेतील अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना सभागृहाला दिला.



विधानसभेत सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. पवार पुढे म्हणाले की, राज्यातील तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी अंतरिम अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. संपूर्ण राज्यामधून भाविक कोल्हापूरमधील ज्योतिबा देवस्थानाला भेट देऊन दर्शन घेत असतात. येथील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ज्योतिबा देवस्थान प्राधिकरण स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्र्यांनी चर्चेला उत्तर देताना केली. त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील पहिली समिती, पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील दुसरी समिती, उच्चाधिकार समिती आणि शिखर समितीच्या मान्यतेबाबतची कार्यवाहीदेखील गतीने करण्यात येईल, असेही त्यांनी । पान २ वर

## तर आम्ही भाजपा-आरएसएसबरोबर जाऊ शकतो, प्रकाश आंबेडकरांचं मोठं वक्तव्य

मुंबई : प्रकाश आंबेडकरांचा वंचित बहुजन आघाडी हा पक्ष महाविकास आघाडीत सहभागी झाला असला तरी अद्याप मविआकडून वंचितला योग्य वागणूक मिळाली नसल्याची तक्रार वंचितच्या नेत्यांनी केली आहे. महाविकास आघाडीत अद्याप जागावाटप झालेलं नाही. चारही पक्षांमध्ये वेगवेगळ्या मतदारसंघांसाठी रस्सीखेच चालू आहे. जागावाटपासाठी नुसत्या चर्चा चालू असून मविआ नेते अद्याप त्यातून कुठलाही निष्कर्ष काढू शकले नाहीत, अशी तक्रार करत प्रकाश आंबेडकर यांनी मविआ नेत्यांवर नाराजी व्यक्त केली आहे. दुसऱ्या बाजूला भाजपाही प्रकाश आंबेडकर यांनी महायुतीत यावं यासाठी प्रयत्न करत आहे.



वंचित बहुजन आघाडी ही महाविकास आघाडीबरोबर राहील की नाही याबाबत अनेकजण साशंक असतानाच वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले, आम्ही सुधारणांमध्ये विश्र्वास ठेवतो. समाज सुधारणं ही आमची प्राथमिकता आहे. राजकीय पक्ष म्हणून काम करत असताना आमचे काही राजकीय अजेंडे असले तरी आमच्यासाठी सामाजिक सुधारणा अधिक महत्त्वाची आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले, सामाजिक सुधारणा करता करता जर आम्हाला सत्ता मिळाली तर आम्ही निश्र्चितपणे त्या सत्तेचा स्वीकार करू. आत्ता आपल्या देशात पौरोहित्य आणि धार्मिक विधींच्या अधिकारांबाबत मोठ्या सुधारणा होणं आवश्यक आहे. प्रकाश आंबेडकर यांनी काही वेळापूर्वी नागपूर येथे टीव्ही ९ मराठीशी बातचीत केली. यावेळी त्यांनी वंचित बहुजन आघाडी आणि भारतीय जनता पार्टीबरोबरच्या संभाव्य युती-आघाडीवर भाष्य केलं.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, आपल्या देशात जे पुजारी, पुरोहित किंवा धार्मिक विधी करणारी जी मंडळी आहे, ती जातीच्या आधारावर आहे. म्हणजेच आज कुंभाराचा पुरोहित त्यांच्या जातीपुरता, लोहाराचा पुरोहित त्यांच्या जातीपुरता मर्यादित आहे. त्या-त्या पुरोहितांना त्यांच्या त्यांच्या समाजापुरती मान्यता आहे. त्याला इतर समाजात मान्यता नाही. त्यामुळे समाजात समता आणि अधिकार दोन्ही आणायचे असतील तर या क्षेत्रात सुधारणा । पान २ वर

## निवडणूक प्रक्रिया यशस्वी पार पाडण्यासाठी नियुक्त अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे : सहा.निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे



पंढरपूर/प्रतिनिधीः आगामी लोकसभा निवडणुक मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी, पोलीस अधिकारी यांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे काम करावे. निवडणूक प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी नियुक्त अधिकारी-कर्मचारी यांनी समन्वयाने काम करावे अशा सूचना सहा.निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.

२५२ पंढरपूर विधानसभा मतदार संघाची सर्व क्षेत्रीय अधिकारी व सेक्टर पोलिस अधिकारी यांची सांस्कृतीक भवन, प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे बैठक घेण्यात आली. बैठकीस उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.अर्जून भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे,तहसिलदार मदन जाधव,अप्पर तहसिलदार तुषार शिंदे, पोलीस निरिक्षक विश्र्वजीत घोडके, निवासी नायब तहसिलदार मनोज श्रोत्री निवडणूक नायब तहसिलदार वैभव बुचके तसेच निवडणुक नियुक्त अधिकारी उपस्थित होते. मतदान केंद्रावर आवश्यक असलेल्या सोयीसुविधांची खात्री करण्यासाठी मतदान केंद्राची पाहणी करणे, व्हीएम-१ व व्हीएम-२ संदर्भात आढावा घेऊन मार्गदर्शन केले.

पंढरपूर विधानसभा मतदार संघामध्ये लोकसभेच्या आदर्श आचारसंहीतेचा भंग होणार नाही. आदर्श आचारसंहीतेचे काटेकोरपणे पालन केले जाईल. यासाठी मतदार संघामध्ये पंढरपूर व मंगळवेढ्यासाठी ४-भरारी पथके, १०-स्थिर सर्वेक्षण पथके, २-व्हिडीओ पाहणी पथके आणि ४- व्हिडीओ सर्वेक्षण पथके तयार केली आहेत. मतदार संघात पंढरपूर तालुक्यासाठी १३ व मंगळवेढा तालुक्यासाठी १५ असे एकूण २८ क्षेत्र भाग तयार केले आहेत. प्रत्येक (सेक्टर) भागासाठी एक स्वंतत्र क्षेत्रीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या सोबत पोलिस सेक्टर ऑफीसरची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी पोलिस सेक्टर ऑफीसर यांचा आढावा घेऊन व्हीएम-१ व व्हीएम-२ बाबत मार्गदर्शन केले. तसेच मतदान केंद्रावर होणा-या भविष्यातील अडीअडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजनेबाबत मार्गदर्शन केले. नागरीकांनी सुध्दा कोणत्याही आवाहनाला किंवा अमिषाला बळी न पडता मतदान करावे, व शंभर टक्के मतदान करावे, असे आवाहन सहा. निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

२५२ पंढरपूर विधानसभा मतदार संघात मतदार जनजागृती

२५२ पंढरपूर विधानसभा मतदार संघात मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृती वाढावी यासाठी प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत असून, आगामी लोकसभा निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने लोकसभा निवडणूकीमध्ये १८ वर्षे पुर्ण असलेल्या पात्र नागरीकांची १०० टक्के नोंदणी असावी यासाठी नागरीकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. सन २०१९ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीमध्ये ज्या मतदान केद्रांवर ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झालेले आहे अशा मतदान केंद्रावर प्रत्यक्ष नागरीकांमध्ये जाऊन मतदान नोंदणी करुन १०० टक्के मतदान करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी नागरीकांना आवाहन केले आहे. तसेच २५२ पंढरपूर विधानसभा मतदार संघामध्ये युवक-युवती यांना मतदार नोंदणी करण्यासाठी तसेच आगामी लोकसभा निवडणूकीमध्ये १००टक्के मतदान करण्याबाबत प्रोत्साहीत करण्यासाठी धनुर्विदया क्रिडा प्रकारात देशपातळीवर प्रतिनिधीत्त्व करणारे श्री विकास मोरे, सुप्रसिध्द गायक श्री मिलिंद शिंदे आणि महाराष्ट्र केसरी किताब मिळविणारे समाधान घोडके यांना ब्रँड अँबेसेडर म्हणून नियुक्त केले असल्याचे प्रांताधिकारी इथापे यांनी सांगितले. त्याचबरोबर मतदानाबाबत महाविद्यालंयामध्ये विविध कार्यक्रम, ईव्हीएम-व्हीव्हीपॅट जनजागृती ,२५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिनाचे आयोजन, अंगणवाडी सेविकांची रॅली, महाविदयालयीन विदयार्थ्यांची पथनाटये आदी कार्यक्रमाचे घेतल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## संपादकीय

### याचाही विचार व्हावा. ..

अजित पवार यांनी सादर केलेला अंतरिम अर्थसंकल्प म्हणजे 'सर्वांसाठी सर्व काही' देणारा आणि लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोणालाही न दुखावणारा अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पाचे सादरीकरण करत असताना आपल्या भाषणाच्या शेवटी अजित पवार यांनी विरोधी पक्ष नेहमीच्या पध्दतीप्रमाणे या अर्थसंकल्पावर टीका करतील अशी अपेक्षा व्यक्त करत असताना कुसुमाग्रज यांच्या 'उगाच टीका करू नका' या आशयाच्या कवितेचा उल्लेख केला असला तरी या अर्थसंकल्पात काहीच नाही अशा प्रकारची टीका विरोधकांकडून होणे साहजिकच आहे. एक फेब्रुवारी रोजी ज्याप्रमाणे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अंतरिम केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला होता त्याच धर्तीवर अजितदादा यांनीसुध्दा महाराष्ट्राचा हा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला आहे. निर्मला सीतारामन यांच्याप्रमाणे अजित पवार यांनीही निवडणुका डोळ्यांसमोर ठेवूनच सर्वांसाठी सर्व काही देण्याचे धोरण कायम ठेवले आहे, असेच दिसून येते. समाजाच्या स्तरातील कोणताच घटक उपेक्षित किंवा मागे राहणार नाही किंवा अनुल्लेखित राहणार नाही या प्रकारे या अंतिम अर्थसंकल्पाची रचना केल्याचे दिसते. राम जन्मभूमी असलेल्या अयोध्या येथे आणि काश्मीरमधील महत्त्वाचे पर्यटनस्थळ असलेल्या श्रीनगर येथे महाराष्ट्र पर्यटन निवास उभारण्याची घोषणा असो किंवा विविध महापुरुषांच्या नावे जाहीर करण्यात आलेल्या अनेक योजना असोत, गेल्या काही दिवसांच्या कालावधीमध्ये ज्या विषयांची चर्चा होत होती किंवा याबाबतचे निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त होत होती त्याच निर्णयांवर शिक्कामोर्तब करण्याचे काम या अंतरिम अर्थसंकल्पाने केले आहे. उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण करण्यासाठी येत्या काही कालावधीमध्ये सरकारला विविध उपायांची योजना करावीच लागणार आहे. अर्थात, संपूर्ण अर्थसंकल्प जेव्हा सादर केला जाईल तेव्हा सरकार उत्पन्न वाढवण्यासाठी कोणते निर्णय घेते हे समोर येईलच. पण केवळ निधीच्या अभावी एखादी चांगली योजना मागे पडावी असे वाटत नसेल तर सरकारला या सर्व योजना प्रत्यक्ष आणण्यासाठी निधीबाबतही गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. विविध योजनांची घोषणा करून सरकारने खर्चाचे नियोजन समोर ठेवले असेल तर आगामी कालावधीमध्ये या खर्चाचा मेळ साधण्यासाठी उत्पन्न कसे मिळवायचे याचाही विचार सरकारला करावा लागणार आहे. विविध योजनांसाठी आर्थिक पाठबळ नसेल तर ते सरकारला निर्माण करावे लागणार आहे, याचाही विचार व्हावा.

पान १ वरुन

### दूध उत्पादक शेतकऱ्यांना ..

सांगितले. राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर ५ रुपयांचे अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात प्रतिदिन १ कोटी ६० लाख लिटर दूध संकलन होत असून त्यानुसार अनुदान योजनेसाठी २८३ कोटींची आवश्यकता आहे. यापैकी २०४ कोटींचा निधी पुरवणी मागणीद्वारे व उर्वरित निधी पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल. योजनेच्या अंमलबजावणीसाठी सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले असून दूध उत्पादक शेतकऱ्यांना थेट लाभ हस्तांतरणाद्वारे त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर अनुदान वर्ग करण्यात येणार आहे, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले.

राज्य चालविणाऱ्यांनी नेहमीच मोठी स्वप्ने बघितली पाहिजेत आणि ती स्वप्ने पूर्ण करण्यासाठी सर्व ताकद लावली पाहिजे, असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, देशाच्या प्रधानमंत्र्यांनी २०४७ पर्यंत विकसित भारत बनविण्याचे आणि भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे निश्चित केले आहे. यामध्ये महाराष्ट्राचे मोठे योगदान राहणार असून इतर राज्यांपेक्षा आपले राज्य निश्चितपणे आघाडीवर असेल. राज्य स्थूल उत्पन्नात प्रतिवर्षी १० टक्के वाढ होत असून त्यात भरीव वाढ करण्याच्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. याद्वारे राज्याने निश्चित केलेल्या कालावधीत राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्यात येणार असल्याचा पुनरुच्चारही उपमुख्यमंत्र्यांनी केला.

उपमुख्यमंत्री म्हणाले की, याआधी अर्थसंकल्पात जाहीर योजनांची अंमलबजावणी सुरु केली आहे. त्या आणि अतिरिक्त योजनांसाठी आवश्यक निधींसाठी पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत. महत्वाच्या योजनांबद्दल माहिती देतांना उपमुख्यमंत्री पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, आशा स्वयंसेविका मानधन, निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनात वाढ केली आहे. नैसर्गिक आपत्तीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत, शेतकऱ्यांना एक रुपयात पीकविमा, नमो शेतकरी सन्मान निधी, गरीब-गरजूंना आनंदाचा शिधा अशा महत्वकांक्षी योजनांसाठी निधीची तरतूद केली आहे.महापुरुषांच्या स्मारकांसाठी केलेल्या तरतुदींसंदर्भात उपमुख्यमंत्री श्री. पवार पुढे म्हणाले की, राज्याला समृद्ध सांस्कृतिक वारसा आहे, गौरवशाली इतिहास आहे. या वारशाचा, महापुरुषांचा सन्मान करण्यासाठी स्मारके आवश्यक आहेत. त्यांच्यासाठीही निधीची तरतूद केली आहे. मुंबईतील इंदू मिल येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे काम गतीने सुरु आहे. या स्मारकासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. क्रांतिसूर्य महात्मा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यातील स्मारकांची घोषणा अंतरिम अर्थसंकल्पात केली आहे. या स्मारकासाठी कराव्या लागणाऱ्या भूसंपादन व इतर बाबींसाठी लागणाऱ्या खर्चासाठी पुरवणी मागण्यांद्वारे निधी देण्यात येईल, अशी ग्वाही देखील उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

# भव्य 'नमो महारोजगार मेळाव्या'चा लाभ घेण्याचे आवाहन; ५५ हजार ७२ रिक्तपदे अधिसूचित

बारामती : विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर आयोजित पुणे विभागस्तरीय 'नमो महारोजगार मेळाव्या'करीता आजपर्यंत ५५ हजार ७२ रिक्तपदे कळविण्यात आली असून नावनोंदणी केलेल्या तसेच नोंदणी करावयाचे राहून गेलेल्या नोकरीइच्छुक अन्य उमेदवारांनीही थेट मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहून मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत बारामती येथे २ आणि ३ मार्च रोजी पुणे विभागातील पुणे, सोलापूर, सातारा, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील उमेदवारांसाठी हा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याकरिता आजपर्यंत ३४७ आस्थापना सहभागी झाल्या असून त्यांच्याकडून ५५ हजार ७२ रिक्तपदे अधिसूचित करण्यात आली आहेत; तर आतापर्यंत ३३ हजारावर युवक-युवतींनी रोजगारासाठी नावनोंदणी केली आहे.

मेळाव्यादरम्यान उपस्थित कंपन्यांमार्फत रोजगार इच्छुक असणाऱ्या दहावी, बारावी, आय.टी.आय., पदविका, पदवीधर, पदव्युत्तर पदवी आदी पदवीप्राप्त उमेदवारांच्या मुलाखती घेऊन तेथेच त्यांना रोजगाराच्या संधी दिल्या जाणार आहेत. तथापि, शिक्षण पूर्ण झालेल्याच नव्हे तर आय.टी.आय.च्या शेवटच्या वर्षात असलेल्या उमेदवारांनाही कंपन्या शिकाऊ योजनेंतर्गत रोजगार उपलब्ध करुन देणार आहेत. त्यामुळे या योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांनीही मेळाव्यासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हा मेळावा ३ मार्च रोजीही असल्याने अद्याप नोंदणी न केलेल्या नोकरी इच्छुक उमेदवारांनी https://rojgar.mahaswayam.gov.in//register या संकेतस्थळावर आपली नावनोंदणी करुन मेळाव्यासाठी उपस्थित रहावे. तसेच मेळाव्याच्या ठिकाणीही ऑफलाईन नोंदणीचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

**'नमो महारोजगार मेळाव्या'च्या पार्श्र्वभूमीवर 'सॉफ्ट स्किल्स' चे प्रशिक्षण**

'नमो महारोजगार मेळाव्या'च्या पार्श्र्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी आप्पासाहेब सभागृह शारदानगर येथे नोकरी विषयक (सॉफ्ट स्किल्स) कौशल्य प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र पवार, विश्र्वस्त सुनंदा पवार, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विद्यापीठाच्या प्राध्यापक डॉ. आदिती काळे, कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र पुणे येथील प्रमुख श्रुती जोशी, ग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे शिक्षण संचालक निलेश नलावडे उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विद्यापीठाच्या प्राध्यापक डॉ. काळे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण दिले. यामध्ये व्यक्तिमत्व विकास, मुलाखत तंत्र, रेझुमे बनविणे आदी प्रशिक्षण दिले. अभिरूप मुलाखत घेत प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दिले. यावेळी सुमारे २ हजारावर विद्यार्थी उपस्थित होते.

ऐश्र्वर्या पोळ, कॉलेज ऑफ ग्रीकल्चर बिझनेस मॅनेजमेंट बारामती: आम्ही आज पर्यंत फक्त व्यक्तिमत्व विकास, करियर याविषयी ऐकले होते. पण आज प्रत्यक्ष मुलाखत कशी द्यायची, त्यात कोणत्या बाबींचा समावेश करावा, आपली देहबोली, वर्तणूक, लोकांशी कसा संवाद साधायचा, मानसिक तसेच शारीरिक आरोग्य जपणे, मुलाखत आदींविषयी चांगले मार्गदर्शन मिळाले. त्याचा आम्हाला रोजगार मिळण्यात तसेच पुढील आयुष्यात कायम लाभ होणार आहे. पायल संजय करंदीकर, पीजी एमबीए विद्यार्थीनी: मुलाखतीला जाताना कशी तयारी करुन जायचे.

व्यावसायिक संबंध व्यवस्थापन कसे करायचे याचे चांगले प्रशिक्षण या सॉफ्ट स्किल विकास प्रशिक्षणातून मिळाले. उद्या येणाऱ्या मेळाव्यात येणाऱ्या कंपन्यांशी नेटवर्किंग कसे करता येईल आणि भविष्यात आपल्या रोजगाराच्या संधी अधिक विस्तारण्यासाठी या प्रशिक्षणाचा लाभ होईल.

प्रियांका दत्तात्रय कांबळे, स्कूल ऑफ रिसर्च सेंटर ऑफ फार्मसी, एडीटी, बारामती: मोठ्या प्रमाणात शालेय शिक्षणात जास्तीत जास्त गुण मिळणाऱ्या युवांनाही चांगले व्यक्तिमत्व विकसित न करता आल्यामुळे रोजगार मिळविण्यात अडचण होते.

आज मिळालेल्या सॉफ्ट स्किल प्रशिक्षणाचा उपयोग आपले ज्ञान सादरीकरणाच्या चांगल्या पद्धतीद्वारे इतरांसमोर कसे मांडता येऊ शकते यासाठी होणार ज्याचा आम्हाला भविष्यात लाभ होणार आहे.

# विधिमंडळाचे अंतरिम अर्थसंकल्पीय अधिवेशन यशस्वी : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई : राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लोकांच्या हिताचे निर्णय घेण्यात आले. देशाच्या विकासात योगदान देणारा अंतरिम अर्थसंकल्प मांडल्याने हे अधिवेशन यशस्वी झाले असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर विधिमंडळातील पत्रकार कक्षात झालेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे, आमदार भरत गोगावले आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, अर्थसंकल्पीय अधिवेशनात महिला, युवा, शेतकरी, कष्टकरी, कामगार यासह सर्व वर्गांसाठी निर्णय घेतले. या अधिवेशनात नऊ विधेयके संमत झाली. वन ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचालीसाठी पूरक व देशाच्या विकासात योगदान देणारा हा अंतरिम अर्थसंकल्प मांडण्यात आला. याशिवाय मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात दिलेला शब्द पाळला. मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे आरक्षण दिले आहे. मराठा समाजाला आरक्षण देताना पूर्ण काळजी घेतली. सर्वोच्च न्यायालयाने काढलेल्या त्रुटी दूर करून आरक्षण दिले. यासाठी अधिसूचनाही काढण्यात आली.

१ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना सामाजिक व आर्थिक सुरक्षा देण्यासाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन देण्यासंदर्भातचा आज निर्णय जाहीर केला. यासंबंधीही शासकीय कर्मचाऱ्यांना शब्द दिला होता, तो या निमित्ताने पाळला. सरकारचे चांगले काम सुरू असून तळागाळात जाऊन काम करणारे हे सरकार आहे. त्यामुळे राज्यात सर्वात जास्त परकीय गुंतवणूक आली आहे. यासंबंधी एका संस्थेने केलेल्या अहवालातही ही बाब नमूद केली आहे. राज्यात देशातील सर्वात जास्त पायाभूत सुविधांचे प्रकल्प सुरू आहेत, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

सन २०२४ चे विधानमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन विधेयकांची व अध्यादेशांची यादी

| | | |
|---|---|---|
| पूर्वीची प्रलंबित विधेयके | : | ०६ |
| नवीन विधेयके | : | १० |
| एकूण | : | १६ |
| दोन्ही सभागृहात संमत | : | ०९ |
| संयुक्त समितीकडे पाठविलेले विधेयक | : | ०६ |
| विधानपरिषदेत प्रलंबित | : | ०१ |
| एकूण | : | १६ |

दोन्ही सभागृहात संमत

(१) सन २०२४ चे वि.स.वि. क्र. ५ – महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२४ (वित्त विभाग) (२) सन २०२४ चे वि.स.वि. क्र. ३.– महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२४ (गृह विभाग) (पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग यांचा विशेषीकृत अभिकरणांमध्ये समावेश करण्याबाबत) (३) सन २०२४ चे वि.स.वि. क्र. ४.– मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२४ (नगर विकास विभाग) (भांडवली मुल्य निश्र्चित करणे शक्य नसल्याने २०२३-२४ चे जे भांडवलीमुल्य होते तेच २०२४-२०२५ या वर्षीसाठी सुधारणा करण्यासाठी विधेयक) (४) सन २०२४ चे वि.प.वि. क्र. १.– महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण) (विधान परिषदेत पुर:स्थापित, विचारार्थ व संमत दि. २८.०२.२०२४, विधानसभेत विचारार्थ व संमत दि. २९.०२.२०२४) (५)सन २०२४ चे वि.स.वि. क्र. ६–डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४ (कलम ६ मध्ये NEP - 2020 च्या तरतूदींची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सुधारणा)



(६) सन २०२४ चे वि.स.वि. क्र. ७.– महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४ (सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग) (सचिवांचा सहकारी जिल्हा संवर्ग घटीत करणे व अशा संवर्गासाठी सेवायोजन निधी स्थापन करणे व कलम ८८ खालील चौकशी व कार्यवाही पूर्ण करण्याचा कालावधी २ वर्षांवरुन १ वर्ष इतका कमी करणे) (७) सन २०२४ चे वि.स.वि.क्र. ८– महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, २०२४ (वित्त विभाग) (विधानसभेत संमत दि. ०१.०३.२०२४, विधान परिषदेत संमत दि. ०१.०३.२०२४) (८) सन २०२४ चे वि.स.वि.क्र.९– महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२४ (नगर विकास विभाग) (९) सन २०२४ चे वि.स.वि.क्र. १०– महाराष्ट्र कामगार कल्याण निधी (सुधारणा) विधेयक, २०२४(उद्योग उर्जा व कामगार विभाग)

संयुक्त समितीकडे प्रलंबित

(१) सन २०२३ चे वि.स.वि.क्र.३४.– महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नौकरीचे नियमन व कल्याण) व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा ) विधेयक, २०२३ (उद्योग उर्जा व कामगार विभाग)

(२) सन २०२३ चे वि.स.वि.क्र.४०– महाराष्ट्र (भेसळयुक्त, अप्रमाणीत किंवा गैर छापाची बियाणे, खते किंवा किटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरिता) शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी विधेयक, २०२३ (३) सन २०२३ चे वि.स.वि.क्र.४१– किटकनाशके (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ (४) सन २०२३ चे वि.स.वि.क्र.४२– बी-बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ (५) सन २०२३ चे वि.स.वि.क्र.४३– अत्यावश्यक वस्तु (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ (६) सन २०२३ चे वि.स.वि.क्र.४४.– महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२३

विधानपरिषदेत प्रलंबित विधेयके

(१) सन २०२४ चे वि.स.वि. क्र. २.– महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२४ (सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग) (सन २०२४ चा महा. अध्यादेश क्र. ०१ चे रुपांतरीत विधेयक) (सहकारी संस्थेच्या अधिकाऱ्या विरुध्द अविश्र्वासाचा प्रस्ताव मांडण्यासाठीचे मागणीपत्र देण्याचा कालावधी सहा महिन्यांवरुन दोन वर्षांपर्यंत वाढविण्याची कलम ७१ एक-ड ची सुधारणा)

### तर आम्ही भाजपा-आरएसएसबरोबर

होणं आवश्यक आहे. कारण हे खूप प्रतीकात्मक आहे.

वंचितचे प्रमुख म्हणाले, आम्हाला असं वाटतं की, देशात जी जातीवर आधारित पुरोहितशाही चालली आहे ती कायद्याने पूर्णपणे बंद करायला हवी. यावर सरकारने बंदी घालायला हवी. त्यासाठी हिंदू स्कूल ऑफ थिओलॉजी (ब्रह्मज्ञान) उभं केलं जावं आणि तिथून शिकून, उत्तीर्ण होऊन जो पुरोहित बाहेर पडेल, जो पुजारी बाहेर पडेल त्यालाच या देशात धार्मिक विधी करण्याचा अधिकार असला पाहिजे. धार्मिक विधी त्याच्यामार्फतच केले जायला हवेत. आरएसएस आणि भाजपा जर असा कायदा आणि सुधारणा आणण्यास तयार असेल तर आम्ही त्यांच्याबरोबर जाण्याचा विचार करू शकतो.

# आपल्या बाळाला ३ मार्चला पोलिओची लस अवश्य द्या : आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांचे आवाहन

मुंबई : राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने 'दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय दरवेळी' हे घोषवाक्य घेऊन ३ मार्च २०२४ रोजी संपूर्ण राज्यात पोलिओ लसीकरण मोहीम राबविली जाणार आहे. या दिवशी ग्रामीण व शहरी भागातील ५ वर्षापर्यंतच्या बालकांना लसीकरण केंद्रावरून पोलिओची लस दिली जाणार असून, सर्व नागरिकांनी आपल्या पाच वर्षाखालील मुला-मुलींना पोलिओची लस देऊन सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी राज्यातील जनतेला केले आहे.

आरोग्य विभागाच्या या मोहिमेअंतर्गत राज्यातील पाच वर्षाखालील १ कोटी १३ लाख ७० हजार ४४३ बालकांना पोलिओचा डोस देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यासाठी राज्यभरात ८९,२९९ बुथ उभारण्यात आले असून सुमारे २ लाख २१ हजारांपेक्षा जास्त कर्मचारी या बुथवर कार्यरत असतील. याशिवाय तीन कोटींपेक्षा अधिक घरांना मोहिमेअंतर्गत भेट दिली जाणार आहे. तसेच एकही बालक पोलिओच्या डोस पासून वंचित राहू नये यासाठी फिरती पथके आणि रात्रीची पथकेही कार्यरत असणार आहेत.

पल्स पोलिओ मोहिमेसंदर्भात राज्यस्तरीय टास्क फोर्सची बैठक घेण्यात आली

असून सर्व जिल्ह्यातही जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्सची बैठक घेण्यात आली आहे. अति जोखमीच्या क्षेत्राकडे अधिक लक्ष देऊन एकही बालक पोलिओ लसीपासून वंचित राहणार नाही याची



खबरदारी घ्यावी, अशा सूचना संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांना विभागाच्या वतीने देण्यात आल्या आहेत. जिल्हा स्तराप्रमाणेच तालुका आणि ग्रामीण स्तरावरही लसीकरणाचे नियोजन करण्यात आले आहे. आरोग्य विभागाने या लसीकरण मोहिमेसाठी आपली यंत्रणा सज्ज केली असून जिल्हा, तालुका आणि ग्रामीण स्तरावर ही मोहीम राबविण्यात येणार आहे. राज्यातील पाच वर्षांपर्यंतचा एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहू नये यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

पल्स पोलिओ लसीकरण दिनाच्या दिवशी डोस न घेऊ शकणाऱ्या वंचित बालकांना गृहभेटी दरम्यान पोलिओ डोस देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेमध्ये आरोग्य विभागासोबतच जागतिक आरोग्य संघटना, युनिसेफ युएसएड, लायन्स क्लब रोटरी क्लब व स्वयंसेवी संस्था तसेच बाल विकास विभाग, शिक्षण विभाग, परिवहन विभाग आदी विभागांचा सहभाग असणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# रिपाइंच्या वतीने अक्कलकोट मध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना निवेदन



अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट शहर व तालुक्याला भेडसावणाऱ्या तीव्र पाणी टंचाई दुर करण्यासाठी त्वरित पाण्याचे टँकर सुरू करण्यात यावे अशयाचे निवेदन जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी महसूल तहसिलदार दत्तात्रय मोहोळे यांना सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे देण्यात आले यावर्षी पावसाळा कमी झाल्याने अक्कलकोट तालुक्याची वरदायीनी ठरलेल्या कुरनूर धरणामध्ये अत्यल्प पाणी साठा जमा झाले होते.. परंतु सध्या कुरनूर धरणामध्ये पाणीच शिल्लक नसल्याने या धरणातून पाणी पुरवठा होत असलेल्या अक्कलकोट शहरातील नागरिकांना पाण्याची टंचाई भासत आहे.सध्या बोअरवेलच्या पाण्याची पातळी पण फार खोलवर गेल्याने बोअरवेल बंद पडत आहेत.तसेच विहीर देखील आटून पडल्याने पाण्यासाठी नागरिकांना भटकंती करावी लागत आहे.

तरी शासनाने अक्कलकोट,मैंदर्गी तसेच दुधनी या शहरात व तसेच तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती सर्व्हे करून ज्या ग्रामपंचायतीला नागरिकांना पाणी अभावी नाहक त्रास होत आहे अशया गावांना त्वरीत पाण्याचे टँकर सुरुवात करुन नागरिकांना दिलासा द्यावे.आसे विनंती मडिखांबे यांनी केली आहे यावेळी रिपाइं तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे,माळी महासंघाचे तालुका अध्यक्ष संतोष पराणे, अमोल बिराजदार,शिवराज जमगे, सागर माळी,आदी उपस्थित होते

# वीस दिवसात १ कोटी १४ लाखाचा मुद्देमाल हस्तगत

**अवैद्य वाळू उपसा प्रकरणी वीस दिवसात १ कोटी १४ लाखाचा मुद्देमाल हस्तगत.**

पंढरपूर तालुक्यात विविध ठिकाणी वैद्य वाळू उपसा करणाऱ्या वाळू तस्करांवर कारवाई करत वीस दिवसात १ कोटी १४ लाखांचा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी हस्तगत करत १७ वाहने ताब्यात घेतली आहेत. यामध्ये जेसीबी, टिपर, ट्रॅक्टरचा समावेश असून १४ आरोपी अटक करण्यात आले आहे. सदरची कारवाई शेगाव दुमाला, गोपाळपूर, चिंचोली भोसे, एकलासपूर येथे करण्यात आली असल्याची माहिती तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मुजावर यांनी दिली.

पंढरपूर /प्रतिनिधीः भीमा नदी पात्रात अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या महसूल अधिकाऱ्यांवर दगडफेक करून पंढरपूर तहसीलदारांची गाडी फोडल्याप्रकरणी तसेच शस्त्रांचा धाक दाखवत अवैध वाळू तस्करी करण्यासाठी वापरलेली वाहने घेऊन फरारी झाल्या प्रकरणी मंडल अधिकारी यांच्या फिर्यादीवरून अकरा वाळू तस्करांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. यामधील सर्व आरोपी फरारी होते.

याप्रकरणी पंढरपूर तालुका पोलिसांनी मोडनिंब रेल्वे स्थानकावरून पळून जाण्याच्या तयारीत असणाऱ्या तीन आरोपी ताब्यात घेऊन न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना पाच दिवसाची पोलीस स्टडी दिली होती.

या तपासा दरम्यान पोलिसांना जेसीबी, टिप्पर, चार मोटारसायकली



असा ४२ लाखांचा मुद्देमाल आढळून आला आहे.यातील आणखी आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक, पोलीस उपाधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मुजावर, पोलीस अधिकारी विश्र्वास पाटील, वडणे, पो.हे.कॉ क्षिरसागर, तोंडले, नलावडे, मोरे, वाडदेकर, माळी, शेख, जगताप यांच्या पथकाने केली आहे.

# मानव सेवा फाउंडेशनच्या वतीने ॲड.गोविंद नारवानी यांचा सत्कार



सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्हा सत्र न्यायालयाचे विधीज्ञ व वकील म्हणून कार्यरत असणारे व सामाजिक क्षेत्रामध्ये गोरगरिबांच्या हितासाठी झटणारे व मानव सेवा फाउंडेशन चे विधी सल्लागार ड. गोविंद नारवानी यांना पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या एल एल एम परीक्षेत एडवोकेट गोविंद नारवाणी यांना ऍड.गुंडोपंत सखाराम वळसंगकर आणि ॲड .विष्णुपंत गुंडोपंत वळसंगकर यांच्या स्मरणात दिले जाणारे सुवर्णपदक विद्यापीठात समारंभ पूर्वक प्रदान करण्यात आले.ॲड .गोविंद नारवाणी हे सोलापूर डी . जी.बी.दयानंद लॉ कॉलेज चे विद्यार्थी आहेत व सोलापूर जिल्हा सत्र न्यायालयात विधीज्ञ म्हणून ते कार्यरत आहेत. यावेळी सत्कार समयी संस्थेचे अध्यक्ष दत्ता कांबळे ऍड .कुणाल तूपसाखरे,ड.उत्तम नवघरे, ऋषिकेश जोगळेकर, मलकांना सोनकांबळे,कृष्णा धोडमनी, चंद्रकांत गायकवाड, निंगाप्पा निंबाळ व आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# रेल्वे सोलापूर कल्याण निरिक्षक सचिन बनसोडे यांच्या दुधनी रिपाइं तर्फे सत्कार




अक्कलकोट/प्रतिनिधीः सोलापूर क्षेत्रीय रेल्वे मुख्य कल्याण निरिक्षक सचिन बनसोडे यांच्या दुधनी शहर रिपाइं(आठवले) तर्फे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले आहे.

अक्कलकोट तालुक्यातील दुधनी रेल्वे स्टेशन येथील टिकट निरिक्षक दालनात रिपाइं शहर शाखेच्या वतिने सचिन बनसोडे यांच्या सत्कार समारंभ आयोजित करण्यात आली होती.क्षेत्रीय सोलापूर कल्याण निरिक्षक म्हणून नियुक्त होवून पहिले भेट दुधनीला दिल्यांने त्यांच्या सत्कार करण्यात आली आहे. याप्रसंगी दुधनी शहर अध्यक्ष श्री गोरखनाथ धोडमनी, स्टेशन प्रबंधक श्री रामराज मीना,रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष श्री सैदप्पा झळकी,बुकिंग सुप्रवायजर श्री वेलु केशवन,श्री ज्ञानेश्र्वर जाधव, महेदिमिंया जिडगे,खाजप्पा लोड्डे व इतर रेल्वे कर्मचारी उपस्थित होते.

# धाराशिव येथे लिंबू मिरची तोडा विज्ञानाशी नाते जोडा अभियानास प्रतिसाद

वागदरी/ एस.के.गायकवाड : अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा धाराशिवच्या वतीने राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने अंधश्रद्धेपोटी नवीन रिक्षा, गाडी,घर बंगला खरेदी केले की नजर लागून काहीतरी अनर्थ



घडूनये म्हणून गाडीला घराच्या चौकटीला लिंबू मिरची बांधतात ही निव्वळ अंधश्रद्धा आहे.या विषयी जाणीव जागृती करण्याकरिता धाराशिव येथे राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून लिंबू मिरची तोडा विज्ञानाशि नाते जोडा हे आभियान राबविण्यात आले असून या आभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. दि.०१/मार्च/२०२४ रोजी धाराशिव येथे दि.२८ फेब्रुवारी राष्ट्रिय विज्ञान दिनाचे औचित्य साधून गुरुवर्य एम.डी देशमुख सर यांच्या वाढदीवसानिमित्त धाराशिव अनिसच्या वतीने विज्ञान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये शाळा कॉलेज मध्ये विज्ञाना विषयी मुलांमध्ये गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने चमत्कारां मागिल विज्ञान प्रयोग दाखवण्यात आले, तसेच विज्ञान प्रश्र्न मंजुषा घेण्यात आली, तसेच धाराशिव बस स्थानक परिसरात अटो रिक्षा वाले यांचे सोबत लिंबू मिरची तोडा विज्ञानाशी नाते जोडा प्रतेक्ष जाऊन प्रभोदन करण्यत आले, या कार्यक्रमात अनेक मण्यवर सहभागी झाले होते. त्यामध्ये.. ॲड. तनुजा हेडा मॅडम, निलेश राऊत,अब्दुल लथीफ, ड अजय वाघाळे, गणेश वाघमारे, ॲड. बाळासाहेब जाधव, सुरेश शेळके, शहर वाहतूक पोलिस प्रभाकर कांबळे, व त्यांचे सहकारी, तसेच मोठया संख्येने परिसरातील व्यवसायिक,ऑटोरिक्षा चालक उपस्थित होते.

# यशवंत पंचायत राज अभियानात पंचायत समिती अक्कलकोट पुणे विभागात प्रथम ११ लाख रुपयांचा पुरस्कार

## उत्कृष्ठ अधिकारी अनिल जगताप व कर्मचारी महेश शेंडे यांचा गौरव



सोलापूर/प्रतिनिधीः प्रशासकिय व्यवस्थापन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणारय-या पंचायत राज संस्थाना शासनातर्फे दिला जाणारा यशवंत पंचायत राज अभियान पुरस्कारामध्ये पुणे विभागामध्ये अक्कलकोट पंचायत समितीने प्रथम क्रमांक पटकाविला. ११ लाख रुपयांचा धनादेश व स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले.

हा पुरस्कारण वितरण सोहळा पुणे येथे विधान भवन सेन्ट्रल हॉल याठिकाणी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते पार पडला. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री दिलीप स्वामी तसेच सध्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मनीषा आव्हाळे मॅडम यांचे मार्गदर्शन तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशादिन शेळकंदे व श्रीमती स्मिता पाटील यांचे मार्गदर्शनात पंचायत समितीने मार्गदर्शक सूचनानुसार कामकाज केले. अक्कलकोट पंचायत समितीच्या वतीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, गट विकास अधिकारी सचिन खुडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी आदर्श कर्मचारी सहाय्यक प्रशासन अधिकारी अनिल जगताप व कनिष्ठ सहाय्यक महेश शेंडे कुर्डूवाडी यांचा विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरव करणेत आला.

यावेळी व्यासपीठावर पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती याशनी नागराज , उपायुक्त (विकास) विजय मुळीक, उपयुक्त अस्थापना राहुल साकोरे, विभागातील सर्व अतिरिक्त मुख्य कार्यकरी अधिकारी , प्रकल्प संचालक , उपमुख्य कार्यकरी आधिकारी प्रशासन आदी उपस्थित होते. सण २००५ - २००६ या आर्थिक वर्षापासून स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून विभाग व राज्य स्तरावर राज्यातील पंचायतराज संस्थांमधून प्रशासकीय व्यवस्थापन व विकास कार्यात अतिउत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिति व ग्रामपंचायत साठी हा पुरस्कार दिला जातो. यामध्ये मागील वर्षामध्ये लोकहितासाठी केलेली विकास कामे, प्रशासकीय कामकाज, अस्थापनाविषयक कामकाज, केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनांची अंमलबजावणी या कामकाजाचे मुल्यांकन विभागीय स्तरावरून व राज्य स्तरावरून तपासणी केली जाते . सदरील तपासणी करून केलेल्या गुणांकनाच्या आधारे अक्कलकोट पंचायत समितीस विभागीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक जाहीर करण्यात आले .

सदरील पुरस्कार स्वीकारण्यासाठी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्रिवन करजखेड, प्रशासन अधिकारी दयानंद परिचारक, विस्तार अधिकारी महेश भोरे, वरिष्ठ सहाय्यक सिधाय्या मठ, गणेश ग्राम, हेमंत ऐवळे आदी उपस्थित होते. सदरील पुरस्काराबद्दल पंचायत समिती अक्कलकोट चे विविध स्तरातून कौतुक होत आहे.

# पंढरपूर शहर पोलीसांकडून जबरी चोरी करणारे आरोपीस अटक

## ५,७५,०००/- रू. किंमतीची वाहने व सोन्याची दागीने हस्तगत केले




पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपुर शहर पोलीस ठाणेस फिर्यादी नामे आशुरबा जानकिराम गादगे, वय २९ वर्षे, रा. धारखेड, जि. परभणी सध्या रा. लोणारी भवन मठ, काळा मारुती जवळ, पंढरपूर येथे शिवाजी चौक येथून रिक्षा नं. एम. एच. १३ सी.टी. ५०४९ रेल्वे स्टेशनकडे जात असताना सदरची रिक्षा ही सावरकर चौक येथे आली असता एक इसम अंदाजे ३५ ते ४० वर्षाचा त्याने टी शर्ट व निळया रंगाची नाईट पॅन्ट घातलेला त्याचे सोबत रिक्षात बसला, रिक्षावाल्याने त्याची रिक्षा रेल्वे स्टेशनच्या गेटच्या समोर घेवून गेला त्यावेळी त्यांनी रिक्षा चालकास विचारले की, रिक्षा कोठे घेवून जात आहे, असे विचारले असता रिक्षा चालकाने सांगितले की, सदरचे गेट बंद आहे. असे सांगितले, नंतर दुस-या गेट जवळ असलेल्या लिंबाच्या झाडाजवळ शेजारी बसलेला इसम व रिक्षा चालक यांनी फिर्यादीस रिक्षातुन ओढून बाहेर काढून हाताने मारहाण करुन त्यांचे खिशातील रोख रक्कम ४००/- व पॅन्टच्या खिशातील सॅमसंग कंपनीचा मोबाईल दोघांनी जबरदस्तीने काढून घेतले बाबत फिर्यादीने दिलेल्या फिर्यादी वरुन अज्ञात इसमाविरुध्द पंढरपुर शहर पोलीस ठाणेस गुन्हा दाखल होता.

सदर गुन्हयाचे तपासात फिर्यादीने सांगितलेल्या इसमाचे वर्णनावरून पंढरपुर शहर गुन्हे आरोपीचा सी.सी.टी. कॅमेरेचे मदतीने व रिक्षाचे क्रमांकावरुन आरोपीचा शोध घेवून सदर आरोपींना अटक करुन त्यांच्या कडून गुन्हयातील रोख रक्कम ४००/- व सॅमसंग कंपनीचा मोबाईल हस्तगत केला आहे.

तसेच रात्रौ हणुमान मैदान येथील संतभवन मठातील रुक्मीणी मातेच्या गळयातील २५,०००/- रुपये किंमतीचे ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी मंगळसुत्र अज्ञात चोरटयाने चोरुन नेल्याबाबत पांडूरंग रघुनाथ हजारे, रा. टाकळी रोड आंनद नगर, पंढरपूर यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन पंढरपुर शहर पोलीस ठाणेस गुन्हा दाखल झाला होता.

सदर गुन्हयाचे तपासात पंढरपुर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर घडले ठिकाणी भेट देवून सदर ठिकाणी राहणारा कोणीतरी आरोपी असावा असा अंदाज घेवून सदर आरोपी

बाबत गोपणीय बातमीदारांना सदर आरोपीचा शोध घेणेबाबत सांगितल्याने सदर आरोपी बाबत गोपणीय बातमीदाराकडून माहिती मिळाली असून सदर आरोपीस ताब्यात घेवून त्याचे कडून सदर गुन्हयातील माल १०० टक्के हस्तगत केला आहे.तसेच शासकीय धान्य गोडाउन येथून मंडल अधिकारी, पंढरपूर यांनी जप्त केलेला एक बिगर नंबरचा लाल रंगाचा महिंद्रा कंपनीचा ६०५ डी १ मॉडेलचा टॅक्टर व बिगर नंबरची भगव्या

रंगाची ट्रॉली अज्ञात इसमाने चोरुन नेलेबाबत शासकिय धान्य गोदाम व्यवस्थापक, सचिन वामन कुंभार, रा. गणपती नगर, टाकळी रोड, पंढरपूर यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन पंढरपुर शहर पोलीस ठाणेस गुन्हा दाखल झाला होता.

तसेच शासकीय धान्य गोडाउन येथून मंडल अधिकारी, पंढरपूर यांनी जप्त केलेला एक बिगर नंबरचा दोस्ती कंपनीचा अशोक लेलैंड अंदाजे किंमत रु.२,००,०००/- चा अज्ञात इसमाने चोरुन नेलेबाबत शासकिय धान्य गोदाम व्यवस्थापक, सचिन वामन कुंभार, रा. गणपती नगर, टाकळी रोड, पंढरपूर यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन पंढरपुर शहर पोलीस ठाणेस प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.

सदर गुन्हयाचे तपासात पंढरपुर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान रेकॉर्ड वरील आरोपीबाबत चौकशी केली असता सदरचा गुन्हा हा रेकॉर्डवरील आरोपीने केला असलेबाबत माहिती मिळाल्याने सदर रेकॉर्डवरील आरोपीस ताब्यात घेवून त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण तपास करुन त्यांच्याकडून सदर गुन्हयातील गेलामाल असा एकूण ५,७५,०००/- रू. किंमतीचे वाहने व सोन्याचे दागीने हस्तगत केले आहेत.

सदरची कामगीरी ही पोलीस अधिक्षक मा. श्री. शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधिक्षक श्री. प्रितम यावलकर सो, मा.श्री. डॉ. अर्जुन भोसले सो., उपविभागीय पोलीस अधिकारी, पंढरपूर विभाग, पंढरपूर व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. विश्र्वजीत घोडके यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि प्रभाकर भुजबळ, सपोफौ राजेश गोसावी, सपोफौ नागनाथ कदम, पोहेकॉ/ शरद कदम, पोहेकॉ/बिपीनचंद्र ढेरे, पोहेकॉ/ सुरज हेंबाडे, पोहेकॉ/ सचिन हॅबाडे, पोहेकॉ/ नवनाथ मानेपोहेकॉ/ गोडसे, पोकॉ/ समाधान माने, पोकॉ/ शहाजी मंडले, पोकॉ/ बजरंग बिचुकले, पोकॉ/ निलेश कांबळे, पोकॉ/योगेश नरळे (सायबर पोलीस ठाणे) यांनी केली असून सदर गुन्हयांचा पुढील तपास पोलीस पोहेकॉ/ सुरज हेंबाडे हे करीत आहेत.

# गरिबांच्या पोटावर पाय ठेवणाऱ्या सरकारने अधिकार त्याग करनेच इष्ट होय

## या विषयावर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : समाज जीवनात कार्यरत फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ८६ वर्षापूर्वी म्हणजे २५ फेब्रुवारी १९३८ ला मुंबई सरकारच्या बजेटवरील चर्चेत सहभागी होताना गरिबांच्या पोटावर पाय ठेवणा-या सरकारने अधिकार त्याग करनेच इष्ट होय. असे म्हटले होते. याची जाणीव ठेवून प्रासंगिकतेचा विचार करून सदरील विधानाच्या ८६ व्या वर्धापनदिनानिमित्त विचारमंथन व्हावे म्हणून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या विद्यमाने वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे २५ फेब्रुवारी २०२४ ला आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते अन्वय गायकवाड यांनी केले. ते याप्रसंगी म्हणाले की, आंबेडकराईट चळवळीच्या लाभार्थ्यांनी पुढे जात असताना मागे राहिलेल्या उर्वरित समाजाला वर आणण्यासाठी सातत्याने, जबाबदारीने कार्य केले पाहिजे. आंबेडकराईट विचारधारेच्या विरोधात आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यक्रम राबविणाऱ्यांच्या आमिषाला बळी पडणारे आंबेडकराईट लोक आंदोलन पुढे कसे नेऊ शकतील? या गंभीर समस्येला सामोरे जात असताना मूलनिवासी बहुजन समाजातील लोकांनी आपले सामूहिक जाळे निर्माण करून पुढे गेले पाहिजे. परस्परांना सहकार्य केले पाहिजे.

या प्रसंगी प्रा. अरुण कांबळे म्हणाले की, आजचे राज्यकर्ते मेलेल्या माणसांच्या टाळूवरील लोणी खाणारे आहेत. त्यामुळे हा विषय साधारणता दुर्लक्षित असल्यासारखाच आहे. अनुसूचित जातीला १३ टक्के बजेट मिळतो किंवा नाही याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. एकुण तरतूदीत आपला वाटा किती? शैक्षणिक दर्जा खालावत चालला आहे. गरिबांच्या पोटावर पाय देत असताना त्यांच्या लक्षात येऊ दिले जात नाही. वर्षभरात बजेट वापरल्या गेले नाही तर मार्च एंडच्या काळात संपविण्याचा प्रयत्न केला जातो किंवा इतरत्र वळविला जातो. अशाप्रकारे मूळ उद्देशाला खीळ घातली जाते. एड. विलास रामटेके म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३८ ला केलेले आग्रही प्रतिपादन आजही समाजाला तसेच लागू पडते. जपान मध्ये समुराई, डोमियास सारखे चार समूह होते, ज्यांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून आपले अधिकार त्याग करून सामान्य जनतेला ते प्रदान करण्यात यावे असे निवेदन त्यांनी सरकारला दिले होते. जेणेकरून समता स्थापित होऊ शकेल. मात्र आपल्या देशात नेमके उलटे घडत आहे. शिक्षणामुळे पुढे जाणाऱ्या जनतेला थांबविण्यासाठी षडयंत्र रचले जात आहेत. शिक्षणाचे खाजगीकरण केले जात असून शैक्षणिक संस्थांना फीस ठरविण्याचे अधिकार प्रदान केले जात आहेत. शैक्षणिक संस्थातील शिक्षकांना अशैक्षणिक कामात गुंतविले जात आहे. ज्यांचा अध्यापनावर दूरगामी परिणाम होतो. धनराज गोंडाणे म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व क्षेत्राचा अभ्यास करून आपले विचार मांडले आहेत. सामान्य माणसाला बँकेतून कर्ज मिळत नाही. शिक्षित लोकांनी यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. वंचित मूलनिवासी बहुजन समाजाला वर ओढण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत पण तसे होताना दिसत नाही. गोविंद कांबळे म्हणाले की, सरकारी सेवेत असणाऱ्या व्यक्ती सरकारच्या विरोधात बोलू शकतील काय? संस्थेच्या विरोधात बोलणा-यांना संस्थेतून काढून टाकले जात असते. समाजातील चार टक्के लोकांना नौक-या लागतील उर्वरित बेरोजगारांचे काय? प्रखर विचार मांडणा-या दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश यांची हत्या करण्यात आली. कार्ल मार्क्सच्या अंत्ययात्रेला मोजके कार्यकर्ते होते ज्यांनी त्यांच्या विचारांना जगभर प्रसारीत केले. तर मग आपण लाखोच्या संख्येने असून सुद्धा का करीत नाही? प्रा. डॉ. भारत पगारे म्हणाले की, संविधानाच्या अंमलबजावणीसाठी बजेट मधील तरतूदीचे लाभ सामान्य माणसाला मिळावेत यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

प्रमुख वक्ते डॉ. संघरत्न गवई म्हणाले की, अतिशय समर्पक विषय आहे. १९३८ ला नामदार लठ्ठे यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावर चर्चा सुरू असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सदरील विधान केले आहे. आपल्याही राज्याची तशीच अवस्था आहे, म्हणून ते तंतोतंत लागू पडते. आपल्या समाजाला उद्योग व्यवसायाचे बाळकडू मिळत नाहीत. व्यावहारिक होताना आपल्या वस्तीत आपणच आपली दुकाने सुरू केली पाहिजेत. दैनंदिन व्यवहारीक जीवनात लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंची साखळी निर्माण केली पाहिजे. एकेकाळी साक्षरता अभियानाच्या डंगरी शाळेतून निरक्षरांना शिक्षण दिले जात असे. करिता पुस्तके वाचण्यासाठी स्टडी सर्कल सारखी ग्रंथालये विकसित केली पाहिजेत. ज्यांच्या घरी नाही कपाट त्यांचे घर सपाट असे म्हटले जाते. आपण पुस्तकात वाचत होतो, आपली मुले मोबाइल मध्ये वाचतात. तंत्रज्ञानाचा सदुपयोग केला पाहिजे. समाजाला कौशल्यपूर्ण शिक्षण दिले पाहिजे. कार्नर सभा घेतल्या पाहिजेत. आपण समाजात पैसा फिरवत ठेवला पाहिजे. आपण काही गोष्टी अशा केल्या पाहिजेत ज्यातून जबाबदारीची जाणीव व्हायला हवी. टोलेजंग इमारती बांधताना खाली दुकान वर



मकान असावे. (नीचे दुकान, उपर मकान) सरकारने विधायक काम करावे. सध्या सहा ते सात टक्के वृद्धी दर आहे, त्यात वाढ झाली पाहिजे. खरेच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आपल्या समाजाची चिंता करतो काय? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या प्रॉब्लेम आफ रुपी समजून घेऊन बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणाचे पारायणे केली पाहिजेत.

अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, १९३७-३८ च्या बजेटवर चर्चेत सहभागी होताना अनेकांनी बजेटचे अभिनंदन केले होते. मात्र बाबासाहेब आंबेडकरांनी असे करने अशक्य असल्याचे सांगताना स्पष्ट केले की, श्रीमंताच्या खिशाला बिलकुल चाट न देता गरिबांना हाल अपेष्टेत दिवस काढण्यास भाग पाडले आहे. पुढे बाबासाहेब आंबेडकरांनी याचीही जाणीव करून दिली होती की, पाश्रिचमात्य देशांतील सरकारे त्यांच्या जनते प्रती किती खर्च करू शकते याचा विचार केला तर कॅनडा ९ पौंड ८ सिलिंग, साऊथ आस्ट्रेलिया १९ पौंड, न्युझीलंड २२ पौंड, आयरिश फ्री स्टेट १० पौंड तर मुंबई सरकार ७ पेन्स असे प्रति व्यक्ती विसंगत विदारक चित्र होते. त्यात आजही फारसा फरक पडलेला दिसत नाही. याचा विचार केला असता केंद्र व राज्य सरकारने जाहीर केलेल्या बजेटकडे बघितले तर सदरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे त्या काळातील विश्र्लेषण तंतोतंत लागू पडते. ज्यामुळे गरीब व श्रीमंतातील दरी रुंदावत चालली आहे. खाजगीकरण व कंत्राटीकरणाने तर यात भरच घातली आहे. ज्यामुळे पूर्वी एका व्यक्तीचे कुटुंबातील उत्पन्न मिळविण्यासाठी आता अख्ख्या कुटुंबाला राबावे लागत आहे, म्हणजे एकंदरीत बेठबिगारी सुरू झाली, असल्याचे पहायला मिळत आहे. यात सामान्य माणूस भरडला जात आहे. आपल्या माणसांनी दारिद्र्य रेषेतील योजनांचा लाभ घेण्यासाठी रांगेत उभे राहण्यापेक्षा आपणांवर दारिद्र्यात खितपत पडण्याची वेळ का आली?याचा शोध घेऊन त्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपली लढाई आत्मसन्मानाची आहे, ज्यात स्वाभीमानाला प्राधान्य दिले पाहिजे. या अनुषंगाने सांगोपांग चिरफाड मिलिंद महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य अर्थतज्ञ डॉ. इंद्रजित आल्टे यांनी त्यांच्या अनुसूचित जाती-जमाती आणि आर्थिक-सामाजिक न्याय : भ्रम आणि वास्तव यामध्ये केली आहे. यावर समाज जीवनात परिसंवादाचे आयोजन अपेक्षित आहे. ज्यामुळे समाजाला वास्तविकता कळेल. त्यात त्यांनी देश स्वतंत्र झाल्यापासून आजतागायत संवैधानिक समूहांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात कधीही अर्थसंकल्पात तरतूद केली नसल्याचे स्पष्ट केले असून २०२२-२३ च्या तरतुदींचा विचार केला तर १६.६ टक्के जनसंख्या असणाऱ्या अनुसूचित जातीला ३.६१ टक्के म्हणजे ३९,४४,९०९ कोटी पैकी १,४२,३४२ कोटी होय तर ८.६ टक्के जनसंख्या असणाऱ्या अनुसूचित जमातीकरिता २.२६ टक्के म्हणजे ८९,२६५.१२ टक्के ची तरतूद केली असल्याचे स्पष्ट केले आहे. या विषयांच्या अनुषंगाने विचार करता जसे सरकार त्यांचे कडे रुपया येणार कसा आणि जाणार कसा? हे जाहीर करते तशीच मांडणी आपण आपल्या समूहाचे, कुटुंबाचे, संस्था, संघटनांचे बाबतीत केली पाहिजे तरच आपण उत्थानाकडे मार्गक्रमण करू शकतो. या अनुषंगाने आपण व आपले नेतृत्व कुठे आहे? म्हणून आपण स्वतःला अदयावत करून, करवून घेतले पाहिजे. करिता फुले शाहू आंबेडकरांईट स्टडी सर्कलमार्फत आपल्या आदर्श महापुरुषांच्या विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त प्रासंगिकता लक्षात घेऊन वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन केले आहे. हे एकमेव स्टडी सर्कल आहे जे न चुकता साप्ताहिक कार्यशाळेच्या माध्यमातून वर्षभर फुले शाहू आंबेडकरांसह सर्व परिवर्तनवादी महापुरुषांच्या विधानांच्या वर्धापनदिनानिमित्त जनतेला सजग करीत आहे. म्हणून आज आपण सदरील विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले आहे. जेणेकरून भारतीय समाजात समता प्रस्थापित झाली तर विविध जाती जातीतील दुरावा समाप्त होईल.

या कार्यशाळेला प्रा. अरुण कांबळे, प्रा. डॉ. भारत पगारे, धनराज गोंडाणे, एड. विलास रामटेके, साधू आनंद, गोविंद कांबळे, डॉ. संघरत्न गवई, बी. बी. मेश्राम, हेमलता पगारे, विराज गोविंद कांबळे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

## कर्मवीर इन्स्टिट्यूट मध्ये शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रम



पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटीलः श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचालित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर सायन्स इंजीनियरिंग व राष्ट्रीय सेवा योजना विवेक विभागातर्फे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे या संस्थेला प्रतिसाद लाभला आहे अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य ड्रॉ एस पी पाटील यांनी दिली महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर सायन्स आणि इंजिनिअरिंग क्सेस तर्फे निबंध वकृत्व व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या महाविद्यालयाचे प्राचार्य ड्रॉ एस पी पाटील व संशोधन अधिकारी ड्रॉ अभय उत्पात यांच्या शुभहस्ते स्पर्धेचे दीप प्रज्वलन करून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली

यावेळी प्राचार्य ड्रॉ एस पी पाटील यांनी शिवाजी महाराजांचे काळाची गरज आहे अशी माहिती देण्यात आली व स्पर्धेतील विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या स्पर्धेसाठी शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात सदर स्पर्धेसाठी सुधीर कुलकर्णी प्रा बागल यांनी उदय कर्वे कर प्रा तब्येत शुभ तांबोळी गोविंदराव पंप पटवार प्रा गणेश बागल यांनी परीक्षक म्हणून काम केले

यावेळी श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे चेअरमन श्री रोहन परिचारक यांनी या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. यावेळी कर्मयोगी महाविद्यालयाचे प्राचार्य ए बी कणसे यांनी राजस्थान डीजे वाळके उप प्राचार्य जे एन मुंडे गावकर संशोधन अधिष्ठाता श्री अभय उत्पात दीपक भोसले अनिल बाबर पांचाळ फॅशन लंबे व अभिनंदन देशपांडे इत्यादी प्राध्यापक वर्ग व सर्व स्टाफ उपस्थित होते



## पाताळेश्वर विद्यालयातील पाच माजी विद्यार्थ्यांची अग्नीवीर म्हणून निवड

निफाड/प्रतिनिधीः सिन्नर तालुक्यातील पाडळी येथील पाताळेश्र्वर माध्यमिक विद्यालयाचे पाच माजी विद्यार्थी भारतीय सैन्य दलात निवड झाली आहे,त्यात गोकुळ रंगनाथ रेवगडे, आशिष पोपट जाधव, नवनाथ दगडू अगिवले, राहुल पुंजा पाटोळे, वैभव साहेबराव सांगळे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे, माजी विद्यार्थीचे बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे सेक्रेटरी व विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. बी. देशमुख व संस्थेचे कोषाध्यक्ष टी. के. रेवगडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. बी. देशमुख यांनी या पाचही विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना आपल्या क्षेत्रांमध्ये वेगवेगळ्या परीक्षा घेतल्या जातात. त्यात तुम्ही सहभागी होऊन सर्वांना बढती मिळवी ही अपेक्षा व्यक्त केली व भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.आशिष जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.विद्यालयाचे २२५ हुन जास्त माजी विद्यार्थी भारतीय सैन्य दलात काम करत आहेत. विद्यालयाचे उपशिक्षक बी. आर. चव्हाण, आर. व्ही. निकम, एस. एम. कोटक .र, आर. टी. गिरी, एम. सी. शिंगोटे, एम.एम. शेख, सविता देशमुख,सी. बी. शिंदे, के. डी. गांगुर्डे, एस. डी. पाटोळे, आर. एस ढोली, ए. बी.थोरे उपस्थित होते.*

## भिवंडीतील संकेत भोसले हत्या प्रकरण, न्याय मागणी एल्गार मोर्चात हजारो नागरिक रस्त्यावर




भिवंडी/प्रतिनिधी : भिवंडीत धक्का लागल्याच्या शुल्लक वादातुन तरुणाचे अपहरण करून त्याला अमानुष मारहाण केल्याने या मारहाणीत संकेत भोसले या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेने शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्र्नचिन्ह निर्माण झाले असून या घटनेच्या निषेधार्थ बुधवारी रिपब्लिकन नेते अॅड. किरण चन्ने यांच्या नेतृत्वाखाली न्याय मागणी एल्गार मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून हा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात आरपीआय सेक्युलरचे राष्ट्रीय अध्यक्ष श्याम दादा गायकवाड, पिंपरी चिंचवडचे आंबेडकरी कार्यकर्ते साकी गायकवाड, अहमदनगर येथील आंबेडकरी कार्यकर्ते प्रदीप थोरात, कॉम्रेड ड. उदय चौधरी, रवींद्र चौधरी,राहुल सोळंखी, सुमित्र कांबळे, शाहूराज साठे, अँड.दिलीप वाळंज, रवींद्र चंदणे, यांच्यासह भिवंडीसह ठाणे, पालघर, पुणे व अहमद नगर येथील आंबेडकर अनुयायांसह पीडित संकेत भोसले यांचे कुटुंबीय या मोर्चात सहभागी झाले होते.

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून वंजारपट्टी नाका मार्गे भिवंडी प्रांत अधिकारी कार्यालय येथे या मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. आपल्या मागण्यांचे निवेदन पीडित संकेत भोसले यांच्या आईसह मोर्चाचे संयोजक ड. किरण चन्ने हे प्रांताधिकारी कार्यालयात घेऊन गेले असता भिवंडी प्रांताधिकारी अमित सानप हे कार्यालयात उपस्थित नसल्याने आंदोलनकर्त्यांचा राग अनावर होत चन्ने यांनी प्रांत अधिकाऱ्यां विरोधात घोषणाबाजी करत निवेदन देण्यास नकार दिला.त्यांनतर आपल्या मागण्यांचे निवेदन भिवंडी पोलीस उपायुक्त श्रीकांत परोपकारी यांच्याकडे दिले. मयत संकेत भोसले यांच्या आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे,फरार सर्व आरोपींना लवकरात लवकर अटक करून कठोर शिक्षा झाली पाहिजे. भिवंडीत शिवा बनसोडे,विकास कांबळे,विकी ढेपे या तरुणांची देखील हत्या झाली होती.या प्रकरणातील आरोपी निर्दोष सुटल्याने मयत तरुणांना आजही न्याय मिळाला नाही त्यामुळे जोपर्यंत मयत संकेत भोसले त्याच्या परिवाराला न्याय मिळत नाही तोपर्यंत आंदोलन यापुढेही आंदोलन सुरूच ठेवणार असल्याची प्रतिक्रिया मोर्चाचे संयोजक ड. किरण चन्ने यांनी दिली आहे.

## युनिटी मल्टीकॉन प्रा लि हे शालेय विद्यार्थ्यांसाठी एक मोठी प्रेरणा : शिवाजीराव मोरे

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : १९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या युनिटी मल्टीकॉन्स कंपनीच्या वतीने नळदुर्ग आणि परिसरातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी त्यांची बुद्धी तल्लक व्हावी या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे विद्यार्थांची गुणवत्ता वाढावी हा दृष्टिकोन मनाशी वाळवून यूनिटी मल्टीकॉन कंपनीच्या वतीने यावर्षी निबंध व



चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या होत्या शेकडो विद्यार्थ्यांने या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला होता युनिटी मल्टीकॉन गेल्या अनेक वर्षांपासून विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात त्यांना प्रेरणा दिली जाते केवळ विद्यार्थ्यांसाठी नाही तर संपूर्ण शहरासाठी आणि शहरातील सर्वच विद्यार्थ्यांसाठी यूनिटी मल्टीकॉन ही प्रेरणादायी आहे असे परखड मत धाराशिव जिल्ह्याचे माजी नियोजन समिती सदस्य शिवाजीराव मोरे हे अध्यक्षीय समारोप करताना केले .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नळदुर्ग नगरीचे माजी नगराध्यक्ष शहबाज काझी यांनी केले

तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष नितीन कासार , माझी .उप नगराध्यक शफीभाई शेख , माजी नगराध्यक्ष मुस्ताक कुरेशी ,माजी नगरसेवक बसवराज धरणे,भाजपचे नेते सुशांत भुमरकर , माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण , डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल चे संस्थापक अध्यक्ष मारुती खारवे , पत्रकार विलास येडगे , शिवाजी गायकवाड काँग्रेसच्या तालुका महिला आघाडी प्रमुख सुभद्राताई मुळे काँग्रेसच्या महिला आघाडी शहर अध्यक्षा कल्पनाताई गायकवाड शिवसेनेचे ज्ञानेश्र्वर घोडके आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त महाराष्ट्र शासन भैरवनाथ कानडे , शोएब काझी आदीजन उपस्थित होते .

निबंध स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धा घेण्यात आलेल्या होत्या निबंध स्पर्धा पारितोषीक प्रथम क्रमांक कदम संस्कृती द्वितीय घोडके मयुरी तृतीय पवार ज्ञानेश्र्वरी चतुर्थ महेक पठाण पाचवा जगताप आकांक्षा उत्तेजनार्थ शांभवी संतोष तर चित्रकला स्पर्धा प्रथम क्रमांक तुळशी मुरमुरे द्वितीय क्रमांक जानकी माताडे तृतीय क्रमांक ज्ञानेश्र्वरी माळी चौथा क्रमांक पूजा सगर पाचवा क्रमांक कुताळे श्रुती उत्तेजनार्थ अलिफा अफजल या विजेत्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक सन्मानचिन्ह व सन्मानपत्र व रोख रक्कम देऊन विजेत्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन नळदुर्ग नगरीचे माजी नगरसेवक तथा कंपनीचे पी आर ओ जनसंपर्क अधिकारी विनायक अहंकारी यांनी केले .हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यूनिटी मल्टीकॉन्स कंपनीच्या कर्मचाऱ्यानी परिश्रम घेतले .